
ePaper


## पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणजे फेकू नंबर वन: संजय राऊत




| वर्ष - 7 | अंक -25 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


### आतील पानांत

- कृषिपंपांना सौरऊर्जेचे बळ!
- किशोर आवारे हत्या प्रकरणात मोठं ट्विस्ट!
- पुण्यातील FTII मध्ये केरला स्टोरीच्या शोपूर्वी घोषणाबाजी


www.mahaenews.com | रविवार, दि. 21 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# आता पिंपरी-चिंचवडमधील वाहनांवर ‘वॉच’!

## » शेखर सिंह: ई-सर्व्हेलन्स प्रकल्पाद्वारे रस्त्यांवरील वाहनांवर नजर

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**‘तिसऱ्या फेरीत समावेश झाल्यानंतरही पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीचे प्रकल्प अग्रस्थानी राहिले आहेत. शहर सध्या २० व्या क्रमांकावर आहे. स्मार्ट सिटीच्या २५ प्रकल्पांपैकी १६ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. उर्वरित नऊ प्रकल्पांचे ८० टक्के काम झाले आहे. ई-सर्व्हेलन्स हा प्रकल्प अत्यंत नावीन्यपूर्ण असून त्याद्वारे रस्त्यांवरील वाहनांवर नजर ठेवण्यात येणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी शेखर सिंह यांनी सांगितले.**



स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत शहराच्या विकास कामांचे अनुषंगाने शहर सल्लागार समितीची बैठक झाली. खासदार श्रीरंग बारणे, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, सह मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, मुख्य माहिती आणि तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण उपस्थित होते.

### विद्यार्थी आणि शिक्षकांवर नजर ठेवली जाणार

जीआयएस प्रकल्पाद्वारे शहरातील उंच इमारती, रस्त्यांचे मोजमाप, बांधकाम यांची माहिती संकलित करून यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होणार आहे. म्युनिसिपल ई-क्लासरुम प्रकल्प महापालिकेच्या १२३ शाळांमध्ये राबविला आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू भाषांचे धडे दिले जात आहे. वर्ग खोल्यांमध्ये स्मार्ट टीव्ही तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग करून विद्यार्थी आणि शिक्षकांवर नजर ठेवली जाणार आहे.

### सीसीटीव्ही यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित

» महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. शाळांमधील स्वच्छता, शौचालये, विद्यार्थ्यांच्या समस्यांकडे लक्ष द्यावे. दिल्ली, मुंबई प्रमाणे महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा दर्जा उंचवावा. शहरातील जास्तीत-जास्त मुलांनी महापालिका शाळांमध्ये प्रवेश घ्यावा, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. शहरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावी, अशी सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी केली.

“ शाळांवर नियंत्रण ठेवण्यासाठी इज्युकेशन सारथी सुरू करण्याचे नियोजन आहे. शहरातील ६० पैकी ४७ व्हीएमडी कार्यरत आहेत. ९५ टक्के सिटी नेटवर्कचे काम पूर्ण झाले आहे. शहरातील दहापैकी आठ ठिकाणी स्मार्ट पार्किंगचे काम पूर्ण झाले असून लवकरच हा प्रकल्प पूर्ण होईल. स्मार्ट पर्यावरण, स्मार्ट वॉटर, स्मार्ट सेव्हरेज, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प देखील प्रगतिपथावर आहेत.

- शेखर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी

# ‘महापालिका आयुक्त शेखर सिंह लंबी छुट्टी पे’..!

## » विक्रम कुमार यांच्याकडे 30 मे पर्यंत कार्यभार

। पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह २२ ते ३० मे २०२३ या कालावधीत रजेवर आहेत. राज्य शासनाने त्यांची रजा मंजूर केली असून, त्यांच्या गैरहजेरीत महापालिका आयुक्तपदाचा अतिरिक्त कार्यभार पुणे महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांच्याकडे सोपविला आहे.

महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या अर्जानुसार शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २२ ते ३० मे २०२३ या कालावधीतील त्यांची रजा मंजूर केली आहे. रजेपूर्वी २० व २१ मे २०२३



या शासकीय सुट्ट्या जोडून घेण्यास शासनाने मान्यता दिली. त्यांच्या गैरहजेरीत अतिरिक्त कार्यभार विक्रम कुमार यांच्याकडे दिला आहे. तसेच, शेखर सिंह रजेवरून परत आल्यानंतर पुन्हा याच पदावर त्यांची फेरनियुक्ती करण्यात येत असल्याचे सहसचिव सु, मो. महाडिक यांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे. दरम्यान, महापालिकेत प्रशासकीय कारभार सुरू आहे. त्यात आयुक्त सर्वेसर्वा असल्यामुळे सर्व निर्णय त्यांच्या मार्फत घेण्यात येत आहेत. परंतु, ते मोठ्या रजेवर जाणार असल्याने महापालिकेतील मोठी कामे खोळंबणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### राज्य शासनाने रजेला दिली मंजुरी..


» महापालिका आयुक्त सिंह यांच्या अर्जानुसार शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने २२ ते ३० मे २०२३ या कालावधीतील त्यांची रजा मंजूर केली आहे. रजेपूर्वी २० व २१ मे २०२३ या शासकीय सुट्ट्या जोडून घेण्यास शासनाने मान्यता दिली.

# कृषिपंपांना सौरऊर्जेचे बळ!

## पंतप्रधान कुसूम योजनेसाठी अर्ज प्रक्रियेला सुरुवात, असा होणार फायदा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शेतीला दिवसा पाणी देता यावे, यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणामार्फत (महाऊर्जा) पंतप्रधान कुसूम सौर योजनेतून शेतकऱ्यांना सौर कृषिपंपांचे वाटप करण्यात येते. त्यासाठी बुधवारपासून अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, त्याअंतर्गत सुमारे २५ हजार सौर कृषिपंपांचे वाटप केले जाणार आहे.**



या योजनेअंतर्गत राज्यात आतापर्यंत ५६ हजार सौर कृषीपंप बसविण्यात आले असून, त्यामध्ये पुणे जिल्हा आघाडीवर आहे. आणखी २० हजार सौर कृषीपंप बसविण्याची प्रक्रिया सुरू आहे. केंद्र सरकारच्या नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने राज्यात एक लाख सौर कृषीपंप बसविण्याचे उद्दिष्ट दिले आहे. त्यामुळे उर्वरित २५ हजार सौर कृषीपंप बसविण्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून, शेतकऱ्यांनी महाऊर्जाच्या ऑनलाइन संकेतस्थळावर अर्ज करावे, असे आवाहन 'महाऊर्जा'ने केले आहे.

या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना त्यांच्या शेतजमिनीच्या आकारानुसार तीन, पाच व साडेसात अश्वशक्ती क्षमतेचे पारेषण विरहीत सौर कृषीपंप देण्यात येतात. अडीच एकरपर्यंत शेतीसाठी तीन अश्वशक्ती, पाच एकर शेतजमिनीसाठी पाच अश्वशक्ती व त्यापेक्षा जास्त शेतजमीनधारकाला साडेसात अश्वशक्ती क्षमतेचे सौर कृषीपंप दिले जातात. सर्वसाधारण प्रवर्गातील शेतकऱ्याला सौर कृषीपंपाच्या किंमतीच्या नव्वद टक्के व अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील शेतकऱ्याला सौर कृषीपंपाच्या किंमतीच्या ९५ टक्के अनुदान देण्यात येते. यात केंद्राचा ३० टक्के; तर राज्याचा ६० ते ६५ टक्के वाटा असतो.

### योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

- सातबारा उतारा व आठ अ उतारा
- आधारकार्ड व बँक पासबुक
- छायाचित्र, आवश्यकता भासल्यास जात प्रमाणपत्र
- सामाईक क्षेत्र असल्यास ना हरकत प्रमाणपत्र

### असा आहे लाभार्थ्यांचा हिस्सा

| प्रवर्ग | तीन एचपी सौरपंप | पाच एचपी सौरपंप | साडेसात एचपी सौरपंप |
|---|---|---|---|
| खुला | १९,३८० रुपये | २६,९७५ रुपये | ३७,४४० रुपये |
| अनुसूचित जाती/जमाती | ९,६९० रुपये | १३,४८८ रुपये | १८,७२० रुपये |

### लाभार्थी निवडीचे निकष

- शेततळे, विहीर, बोअरवेल, बारमाही नदी/नाले अथवा शाश्वत पाण्याच्या स्रोत उपलब्ध असलेले शेतकरी
- पारंपरिक वीजजोडणी उपलब्ध नसलेले शेतकरी
- अटल सौर कृषी पंप योजनेचा पहिला व दुसरा टप्पा किंवा मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेअंतर्गत अर्ज मंजूर न झालेले अर्जदार

### योजनेचा होणारा फायदा

- शेतीपंपांना दिवसा वीज उपलब्ध होते
- विनाव्यत्यय अखंडित वीजपुरवठा होतो
- वीजबिले येत नाहीत
- डिझेल पंपाच्या तुलनेत परिचालनाचा खर्च येत नाही

---

# किशोर आवारे हत्या प्रकरणात मोठं ट्विस्ट

## मास्टरमाईंडबद्दल पोलिसांना आला नवा संशय

। मावळ । महाईन्यूज ।

**किशोर आवारे यांचा खून कसा करण्यात आला? केव्हापासून हत्येचं प्लॅनिंग सुरु होतं? याची माहिती आरोपींनी पोलिसांना दिली आहे. अशात आता या प्रकरणात पोलिसांना नवी लीड मिळाली आहे. त्यांच्या एका संशयामुळे या प्रकरणाला नवं वळण लागण्याची शक्यता आहे.जनसेवा विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे यांच्या हत्येत आता आणखी एक ट्विस्ट आला आहे. किशोर आवारे यांच्या हत्येमुळे माजी उपनगराध्यक्ष भानू खळदे याचा सहभाग असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे हाच या प्रकरणाचा मास्टर माईंड तर नाही ना? असा संशय पोलिसाना आहे. सध्या भानू खळदे हा फरार असून पोलिस पथक यांच्या मागावर पाठवण्यात आली आहे.**



### चंद्रभान खळदे पसार

आवारे यांच्या खुनानंतर चंद्रभान खळदे हादेखील पसार आहे. आरोपींकडे पोलीस कोठडीत केलेल्या तपासात या गुन्ह्यात चंद्रभान खळदे याचाही सहभाग असल्याचे समोर आले आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत. दरम्यान, सहाही आरोपींच्या पोलीस कोठडीची मुदत शनिवारी (दि. २०) संपल्याने त्यांना वडगाव – मावळ न्यायालयात हजर केले असता सर्वांच्या पोलीस कोठडीत २५ मेपर्यंत वाढ करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

मावळ तालुक्यातील तळेगाव नगर परिषदेसमोर जनसेवा विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे यांचा निर्घृण खून करण्यात आला होता. त्यामुळे संपूर्ण पुणे जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती. १२ मे रोजी किशोर आवारे यांची हत्या झाली होती. या प्रकरणात पोलिसांनी अगोदर ७ जणांना अटक केलेली आहे. त्यांना आजा न्यायालयाने २५ मे पर्यंत कोठडी सुनावली आहे.

वडिलांच्या अपमानाचा बदला घेण्यासाठी भानू खळदे याचा मुलगा गौरव खळदेने ही हत्या घडून आणल्याचं समोर आलं आहे. मात्र, आता भानू खळदे यानेच हे सर्व घडवून आणलं असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात येत आहे. या घटनेत हत्या करणाऱ्यांमध्ये सात जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यामुळे मुख्य सूत्रधार भानू खळदे असल्याचा संशय पोलिसांना आहे. पोलिसांकडून या प्रकरणाच्या मुळापर्यंत जाण्यासाठी प्रयत्न करत असून भानू खळदे याला पकडल्यानंतर या प्रकरणाचा उलगडा होणार असल्याचे देखील बोलले जात आहे. किशोर आवारे यांच्या हत्येनंतर त्यांचे कुटुंबाने रस्त्यावर उतरून त्यांच्या आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी आंदोलन देखील केले होते.

# पुण्यातील FTII मध्ये केरला स्टोरीच्या शोपूर्वी घोषणाबाजी




। पुणे । महाईन्यूज ।

एफटीआयआयमध्ये शनिवारी सकाळी आयोजित करण्यात आलेल्या 'द केरला स्टोरी' या चित्रपटाच्या विशेष शोच्या विरोधात विद्यार्थ्यांनी तीव्र निदर्शने सुरू केली आहेत. चित्रपटाचा शो सुरू होण्यापूर्वी काही जणांनी लव्ह जिहादच्या मुद्द्यावरून जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उद्विग्न होऊन, निदर्शने करीत घोषणाबाजी करणाऱ्यांना कॅम्पसच्या बाहेर काढण्याची जोरदार मागणी केली. अभिनेते योगेश सोमण यांनी घोषणाबाजी केल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. योगेश सोमण यांनी तातडीने कॅम्पस बाहेर काढण्याची मागणी केली आहे. मिती फिल्म सोसायटीने विशेष शोचे आयोजन केले होते. द केरला स्टोरीच्या शोसाठी भाजप नेते चंद्रकांत पाटील यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलवण्यात आले होते. परंतु, चंद्रकांत पाटील याठिकाणी आले नाहीत. FTII च्या विद्यार्थी समुदायाला या कार्यक्रमाची माहिती देण्यात आली नव्हती. कदाचित विरोध टाळण्यासाठी ही बातमी आदल्या दिवशीच संध्याकाळी बाहेर आली. पण त्याचा निषेध आपण करायला हवा.

# छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी कार्यक्रमासाठी महापालिकेचे अनुदान!

## मौजे वढू बु. ग्रामस्थांनी मानले आभार, एकूण 2.99 लाखांचा निधी

। पिंपरी चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वढू बु. येथे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान स्थळी छत्रपतींचा पुण्यतिथी कार्यक्रम होतो.या ठिकाणी राज्यातील शिव-शंभूप्रेमी भेट देत असतात. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या वतीने २. ९९ हजार रुपये अनुदान मंजूर करण्यात आले.**



भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी काही महिन्यांपूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिका मागणी केली होती. प्रतिवर्षी फाल्गून अमावस्येला संभाजी महाराजांचा बलिदान दिन अर्थात पुण्यतिथीनिमित्त आयोजित केला जातो. या कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध व्हावा. यासाठी पाठपुरावा करण्यात आला.

दरम्यान, महापालिका स्थायी समिती आणि सर्वसाधारण सभेत याबाबत प्रस्ताव तयार करुन त्याला मंजुरी देण्यात आली होती. भाजपाचे माजी नगरसेवक विकास डोळस यांनी याबाबत सभागृहात आग्रही पुढाकार घेतला होता.

छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी साजरी करताना सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत निधीअभावी अडचणी येतात. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने ग्रामपंचायतला प्रतिवर्षी मदत करावी, अशी मागणी ग्रामस्थांनीही केली होती. त्यामुळे पुण्यतिथीदिनी समाधी स्थळाच्या ठिकाणी मंडप व लाईट व्यवस्था, पिण्याचे पाणी, हार-फुले इत्यादी करिता महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून प्रतिवर्षी देण्यात येणार आहेत.

> **“ हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांचे समाधीस्थळ मौजे वढू बु. येथे प्रतिवर्षी पुण्यतिथीनिमित्त होणाऱ्या कार्यक्रमासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या वतीने निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी सूचना केली होती. यावर्षीपासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. याबाबत महापालिका प्रशासनाचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो. समाधी स्थळी सोयी-सुविधा आणि पावित्र्य जपण्याकामी कायम पुढाकार घेण्याची आमची भूमिका आहे.**
>
> **- महेश लांडगे,**
> **शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

### ग्रामस्थांनी व्यक्त केले आभार

» पुण्यतिथी दिनी वढू बु. येथे सुमारे दीड लाख शिवप्रेमी येत असतात. त्यांना जेवण, मंडप, स्वच्छतागृह, लाईट अशा पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी निधी कमी पडतो. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिकेने दरवर्षी आम्हाला निधी उपलब्ध करुन देण्याचा स्वागतार्ह निर्णय घेतला. याबाबत आमदार महेश लांडगे आणि महापालिका प्रशासनाचे आम्ही आभार मानतो, अशा भावना मौजे वढू बु. च्या सरपंच सारिका शिवले यांनी व्यक्त केल्या.

पिंपरी-चिंचवड महापालिका अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ यांच्या हस्ते वढु बु. ग्रामस्थांना यावर्षीचा २.९९ लाखांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी प्रशासन अधिकारी विठ्ठल जोशी, ग्रामविकास अधिकारी शंकर भाकरे आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

---

# नागरिकांना आता रेशनकार्ड ई-शिधापत्रिका मिळणार मोफत

## अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा महत्वाचा निर्णय

### ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉप किपर्स असोसिएशनकडून शासन निर्णयाचे स्वागत

। पिंपरी । महाईन्यूज ।

**राज्याच्या अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने मंगळवारी (दि. १६) रोजी सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत ई-शिधापत्रिका सुविधा ही सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक लुट थांबविण्यासाठी निःशुल्क उपलब्ध करुन देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतलेला आहे. तसा आदेश पुणे विभागाचे पुरवठा उपायुक्त डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी काढला आहे. या शासन निर्णयाचे ऑल महाराष्ट्र फेअर प्राईज शॉप किपर्स असोसिएशनचे खजिनदार विजय गुप्ता यांनी असोसिएशनच्या वतीने पत्रकाद्वारे स्वागत केले आहे.**



असोसिएशनचे खजिनदार विजय गुप्ता यांनी पत्रात म्हटले आहे की, ”सरकारी काम व सहा महिने थांब” या उक्तीप्रमाणे सर्वसामान्य नागरिकांना पूर्वी रेशनकार्डसाठी तहसिल कार्यालयाचे, परिमंडळ कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत होते. त्यात प्रत्येक वेळी वेगवेगळ्या कागदपत्रांसाठी पिळवणूक करण्यात येत होती. अनेकांनी तर तहसिल, परिमंडळ कार्यालयात रेशनकार्डासाठी दुकानं थाटली होती. त्यात एजंटचा धुमाकूळ चालू होता. सरकारी अधिकारी सर्वसामान्य जनतेचे काम न करता एजंटाचेच रेशनकार्डचे काम करतात अशा टिका होत होत्या. रेशन कार्डसाठी सर्रास एजंट लोक दोन ते तीन हजार रुपये सर्वसामान्यांकडून घेत होते व वारंवार चकरा मारायला लावत होते. आता या सर्व कचाट्यातून सर्वसामान्य नागरिकांची सुटका शासनाने केलेली आहे. आता दलालांचा धंदा बंद होणार असून, सामान्य नागरिकास घरपोच कसलाही खर्च न करता मोफत रेशनकार्ड उपलब्ध होणार आहे, असे गुप्ता यांनी म्हटले आहे.

अन्न नागरी पुरवठा विभागाने महाराष्ट्र शासन, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग शासन निर्णय क्र. शिवाप-२०२१/प्र.क्र.१९ /ना.पु.२८, दि. १६ मे २०२३ रोजी निर्गमित केलेला आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या (अंत्योदय अन्न योजना (AAY) व प्राधान्य कुटुंब योजना (PHH ) व राज्य योजनेच्या (APL शेतकरी, राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेव्यतिरिक्त (NPH), APL शेतकरी व्यतिरिक्त व APL शुभ) शिधापत्रिकाधारक अशा सर्व शिधापत्रिकाधारकांना ऑनलाईन सेवेव्दारे ई-शिधापत्रिका सुविधा निःशुल्क (मोफत) उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

### नागरिकांना मोठा दिलासा

» अर्जदार यांनी शिधापत्रिकेसाठी HTTPS://REMS.MAHAFOOD.GOV.IN या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर प्रचलित कार्यपध्दतीनुसार तपासणी करुन योजनेच्या प्रकारानुसार ऑनलाईन ई-शिधापत्रिका उपलब्ध करुन देण्यात येईल. अर्जदारास RCMS च्या संकेतस्थळावरुन PUBLIC LOGIN मधून ई शिधापत्रिका डाऊनलोड करता येईल. त्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे, असे विजय गुप्ता यांनी पत्रकात म्हटले आहे.

# लंबी चर्मरोग नियंत्रणात पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांचे योगदान...



प्रासंगिक

भाग - 2
**डॉ. व्यंकटराव घोरपडे,**
सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त
पशुसंवर्धन, सांगली.

## पशुसंवर्धन दिन विशेष

साथ रोग नियंत्रण हे खूप जिकिरीचे, क्लिष्ट आणि संवेदनशील असा विषय असतो. रोज बाधित जनावरांची संख्या, उपचार, लसीकरण, लसीची उपलब्धता, उपचाराला मिळणारा प्रतिसाद, काही अपघात, माध्यमांचा दबाव, लोकप्रतिनिधींचा आग्रह, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन, थेट संवादांचा अभाव, स्थानिक दवाखान्यातील परिस्थिती, आणि पशुपालकांचा प्रतिसाद अशा अनेक बाबी या साथ रोगाशी संबंधित असतात. यातील अनेक बाबी आपण सर्वांनी कोविड काळात अनुभवल्या आहेत.

राज्यातील रिक्त पदांची संख्या पाहिल्या तर विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत याची नोंद घ्यावीच लागेल. विशेषतः क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी जीवाचे रान केले. अनेक अधिकारी जखमी झाले, अपघात झाले, रात्री अपरात्री अनेक पशुपालकांना सेवा देताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. विभागातील अनेक महिला अधिकाऱ्यांनी य देखील या रोग नियंत्रणात आघाडीवर होत्या. प्रत्येक जण आपापल्या कार्यक्षेत्रातील पशुधन मृत्यू संख्या कमी ठेवण्यासाठी झटत होते. अनेक कौटुंबिक अडचणी देखील आल्या,रजा मिळत नव्हत्या पण त्या सर्वावर मात केली. राज्यपातळीवरून येणाऱ्या मार्गदर्शक सूचना, वेगवेगळे परिपत्रक दृकश्राव्य माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या आढावा सभा या व्यतिरिक्त देखील राजपत्रित पशुवैद्यक संघटनेने स्वतः पुढाकार घेऊन वेगवेगळ्या समाज माध्यमांचा, दृकश्राव्य माध्यमांचा वापर करून पशुपालकासाठी 'माझा गोठा स्वच्छ गोठा' यासारखे व राज्यातील सर्व अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी अनेक तज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सामूहिकपणे त्याचा चांगला मुकाबला करता आला. संपूर्ण राज्यात सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक यांनी सर्व उपचार पशुपालकांच्या दारात मोफत दिले. कोणत्याही प्रकारचा इंधन भत्ता उपलब्ध नसताना देखील परिस्थितीची जाण ठेवून हे उपचार मोफत दिले.





या रोगाचा प्रादुर्भाव तसा नवीन असल्यामुळे अनेक वेळा मार्गदर्शक सूचना आणि स्थानिक परिस्थिती याचा विचार करून काही निर्णय घेतले गेले. वरिष्ठांच्या सूचनेनुसार स्थानिक पातळीवर लागणारी औषधे स्वतःच्या खिशातून खरेदी केली, उपचार केले. अशा काही बाबी इतर कोणत्याही विभागात घडत असतील असे वाटत नाही. त्यामुळे ही सर्व मंडळी नक्कीच कौतुकास पात्र आहेत. पण त्याची नोंद, लंपी योद्धा म्हणून कौतुक, नियमानुसार झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती यासह अनेक बाबी प्रलंबित असल्याचीही कुजबुज ऐकायला मिळते. निश्चितच हे भूषणावह नाही. ही एक लिटमस टेस्ट होती. येणाऱ्या काळात अशा परिस्थितीत काम करायचे झाल्यास या बाबी फार महत्त्वाच्या आहेत याची नोंद संबंधितांना घ्यावी लागेल.

पशुसंवर्धन विभागाने देखील या प्रक्रियेत अनेक गोष्टी अनुभवल्या. केंद्र- राज्य शासनाच्या सूचना, मार्गदर्शन या सर्व बाबी खालील क्षेत्रीय अधिकाऱ्यापर्यंत पोहोचवणे. सर्व आवश्यक बाबी उपलब्ध करणे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग वाढवणे. वेळोवेळी दृकश्राव्य माध्यमातून तज्ञ समितींचे उपचार प्रोटोकॉल, प्रतिबंधक उपाय याबाबत युद्ध पातळीवर कार्यवाही करणे. सोबत अति तातडीची औषध खरेदी वेळेत करणे, त्यासाठी अर्थिक तरतुद उपलब्ध करणे सोबत राज्यातील ज्या पशुपालांची जनावरे म्रुत झाली त्यांच्या खात्यात अनुदान रक्कम जमा करणे तसेच क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे मनोबल वाढवणे व ते टिकवुन ठेवणे अशा अनेक गोष्टी या साथीच्या रोगापासून शिकता आल्या. त्यानिमित्ताने विभागाच्या मर्यादा, अडीअडचणीचा आढावा घेतला गेला त्यामुळे भविष्यातील नियोजनाचा आराखडा देखील तयार करता आला.

राज्याच्या बाबतीत विशेष बाब म्हणजे आपल्याला स्वतंत्रपणे पुण्यातील पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्थेला लंपी चर्म रोगावरील लस उत्पादनासाठी तंत्रज्ञान,परवाना व आर्थिक तरतूद देखील केंद्र सरकार कडून उपलब्ध झाली ही सुद्धा फार मोठी गोष्ट या रोगाच्या साथीमुळे घडली आहे. एकंदरीत सर्व विभाग पशुपालक, स्थानिक स्वराज्य संस्था या अनुभवातून खूप काही शिकल्या आणि अशा परिस्थितीतही आपण चांगले काम सर्वजण करू शकतो हा आत्मविश्वास निर्माण झाला ही फार मोठी उपलब्धता काही कमी नाही हे निश्चित.

**(समाप्त)**

## संपादकीय »

### तोंड दाबून बुक्क्यांचा मार!

***समाजातील तळागाळापर्यंत पोहोचलेल्या सहकारी बँका आणि सर्व बँकांची शिखर बँक असलेली रिझर्व्ह बँक यांचे परस्परसंबंध खरे तर परस्परपूरक असायला हवेत.***

तसे असणे अपेक्षितही आहे. पण प्रत्यक्षात मात्र सहकारी बँकांना तसा अनुभव येत नाही. रिझर्व्ह बँकेकडून लादली जाणारी नियंत्रणे सहकारी बँकांना फक्त जाचकच नाही, तर व्यवसाय करण्यात अडचणी आणणारीही ठरतात. कसे ते पहा. गतवर्षी ८ जून २०२२ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांची गृह कर्ज योजनेची मर्यादा दुपटीने म्हणजेच १.४० (एक कोटी ४० लाख) पर्यंत वाढवली. त्यामुळे नागरी सहकारी बँक क्षेत्रात आनंदाचे वातावरण पसरले. परंतु ती वाढवताना या बाबीशी निगडित अन्य गोष्टींचा विचार अद्यापही केला गेला नाही. गृह कर्जमर्यादा वाढवली तरी सहकारी बँकेने एकूण गृह कर्जे किती वितरित करावीत याला मर्यादा आहे. बँकेच्या एकूण कर्जापैकी, व्यावसायिक बांधकाम क्षेत्राला दिलेली कर्जे १५ टक्क्यांपेक्षा अधिक नसणे अभिप्रेत आहे. सदर १५ टक्क्यांमध्येच १० टक्क्यांपर्यंतची उपमर्यादा गृह कर्जासाठी दिली आहे. ती अनावश्यक आहे.

**राजीव मल्होत्रा हे अत्यंत आक्रमक शैलीत लेखन करणारे विचारवंत आहेत. एकीकडे प्रस्थापित समज, ठोकताळे, आकलन मोडून काढायचे आणि दुसरीकडे भविष्यातील (त्यांना वाटणाऱ्या) धोक्यांकडे विचारी जनांचे लक्ष वेधायचे, समाजाला इशारे द्यायचे, त्यासाठी भरपूर प्रवास करायचा व ग्रंथलेखन करायचे, हा गेल्या काही दशकांचा शिरस्ता आहे.**

## गंभीर प्रश्नांचे मोहोळ

यातून अनेक पुस्तके जन्माला आली. 'ब्रेकिंग इंडिया' हे त्यांचे पुस्तक येऊन बराच काळ लोटला. या पुस्तकात त्यांनी भारतात कोणताही सज्जड पुरावा नसताना 'द्राविडीयन संस्कृती'चा सवतासुभा कसा उभा केला आहे, याचे विश्लेषण केले होते. या पाश्चात्त्यांच्या व त्यांच्या बौद्धिक प्रभावाखालील देशी अभ्यासकांच्या दुफळीबाज कामाला आता 'द्राविडी ख्रिस्ती' चळवळीचा नवा आयाम आला आहे, असा त्यांचा दावा होता. प्रस्तुत पुस्तक हे या आधीच्या ग्रंथाचा पुढचा भाग आहे. दोन्हींच्या कथनात दृष्टिकोनात्मक आणि सैद्धान्तिक सलगता आहे, म्हणूनच स्वत: लेखकानेच याला 'ब्रेकिंग इंडिया : ०२' असे म्हटले आहे. जगभरातच कट-कारस्थाने उलगडून दाखविणाऱ्या (कॉन्स्पिरसी थिअरीज) लेखक, विचारवंतांना जोरदार मागणी असते. अनेक राज्यशास्त्राचे अभ्यासक, संपादक जन्मभर केवळ या एकाच निकषाने काम करीत असतात. मात्र, आपण तसे नाही. आपल्याकडे प्रत्येक विधानाचा पुरावा आहे, असा दावा राजीव मल्होत्रा करतात. भारतीय एकात्मता आणि संस्कृतीच्या विरोधात अमेरिकेत चाललेले भव्य कारस्थान; त्याला बळी पडणारे भारतीय उद्योगपती, विचारवंत व अभ्यासक असा या ग्रंथाचा सारांश आहे. मात्र, हे सांगण्यासाठी मल्होत्रा यांनी प्रचंड अभ्यास करून शेकडो पाने लिहिली आहेत. भारताविरुद्ध जे बौद्धिक कारस्थान चालू आहे, त्यात 'आयव्ही लीग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समूहातील 'हार्वर्ड', 'स्टॅनफर्ड', 'येल', 'प्रिन्स्टन' ही अमेरिकी विद्यापीठे आघाडीवर आहेत, असा लेखकाचा दावा आहे. यातही 'हार्वर्ड' हे विद्यापीठ यांचा म्होरक्या आहे. 'हार्वर्ड' विद्यापीठात सध्या काम करणारे सूरज येंगडे अलीकडेच भारतात आले होते. ते व इतर तसे लेखकाच्या रडारवर आहेत. खरे तर, 'हार्वर्ड'चा भारतीय विद्यांचा अभ्यासक्रम नावाजला जातो. रामकृष्ण मठाचे सर्वाधिक लोकप्रिय व अद्वैत वेदान्ताचे अभ्यासक



स्वामी सर्वप्रियानंद हे 'हार्वर्ड'च्या 'इंडियन स्टडीज स्कूल'चे स्नातक, 'फेलो' आहेत. मात्र, मल्होत्रा यांच्या मते 'दलित विरुद्ध सवर्ण' अशी मोठी दुफळी भारतात निर्माण व्हावी, या प्रयत्नांमधील या साऱ्या खेळ्या आहेत. अमेरिकेत 'ब्लॅक विरुद्ध व्हाइट' हा वैचारिक संघर्ष पार अमेरिकेच्या जन्मापर्यंत गेला असून, तेव्हापासूनच्या श्रेय-अपश्रेयांची ओढाताण चालू आहे. तसे भारतात व्हावे, हा 'हार्वर्ड'चा प्रयत्न आहे, असे लेखकाला वाटते. त्यातही गंमत म्हणजे, अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशात यासाठी 'मार्क्सिस्ट मॉडेल' वापरले जात आहे आणि ही भारताच्या विरोधात उभी राहिलेली अनोखी युती आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कुंपणानेच शेत खाल्ले!

## धाराशिवमधील सर्वात मोठ्या बँकेत महाघोटाळा, कोट्यवधींचा अपहार, फसवणूक

।धाराशिव।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**५ कोटी ४६ लाख १२ हजार रुपयेच्या अपहार व फसवणुक प्रकरणी धाराशिव जनता सहकारी बँकेच्या तत्कालीन तत्कालीन अध्यक्ष, संचालक मंडळ व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या विरुध्द धाराशिव शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झालाय.**




### धाराशिव शहर पोलीसांत गुन्हा दाखल

**या कारणामुळे धाराशिव जनता सहकारी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, संचालक मंडळ व तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या विरुध्द धाराशिव जनता सहकारी बँकेचे सभासद प्रविण विष्णुपंत धाबेकर ( वय ५३ वर्षे, व्यवसाय टाटा शोरुम, रा. शंत्रुजय बिल्डींग, तांबरी विभाग, धाराशिव) यांनी धाराशिव शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर १७३/२०२३ भा.द.सं. कलम ४२०, ४०९, ३४ अन्वये १९ मे २०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणी पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष शेजाळ हे करीत आहेत.**

या बाबत अधिक माहिती अशी की, २८ सप्टेंबर २००५ ते ३१ मार्च २००८ दरम्यान धाराशिव जनता सहकारी बँकेचे तत्कालीन चेरमन, संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संगनमत करून नियमबाह्य पद्धतीने बॉण्ड खरेदी केले. हे करताना त्यांनी नोएडा टोल ब्रिज कंपनी लि. ही कंपनी दिवाळखोरीत असताना व त्या कंपनीची पडताळणी केली नाही.

तसेच त्या कंपनीमध्ये मुंबईच्या एसीई गिल्टस ट्रेडींग प्रा.लि. या ब्रोकर कंपनीच्या मार्फत जैन सहकारी बॅक लि. आणि बेंगळुरूच्या दि टेक्सस्टाईल को.ऑपरेटीव्ह बॅक लि. येथील खात्यावरुन एकूण ४४०० डिप डिस्काउंट बॉन्ड खरेदी करण्यासाठी प्रत्येकी २३००० रुपयांप्रमाणे असे जास्तीची रक्कम देऊन नियमबाह्य पध्दतीने बॉन्ड खरेदी केली.

तसेच रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया यांच्या नियमावलीचे उल्लंघन करुन ५ कोटी ४६ लाख १२ हजार इतक्या धाराशिव जनता सहकारी बॅकेतील सभासद व ठेवीदार यांच्या रक्कमेचा अपहार करुन फसवणूक केली.

---

## सिद्धरामय्यांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ, डीके शिवकुमार उपमुख्यमंत्रीपदी विराजमान



।नवी दिल्ली।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

कर्नाटकमध्ये नव्या सरकारची स्थापना झाली आहे. काँग्रेसचे कर्नाटकमधील वरिष्ठ नेते सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्रीपदाची तर कर्नाटक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष डीके शिवकुमार यांनी उपसमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. कर्नाटकमध्ये काँग्रेसला बहुमत मिळाल्यानंतर आता पक्षाने राज्यात सरकार स्थापन केलं आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आणि विरोधी पक्षांमधील नेत्यांनी या शपथविधीला हजेरी लावली होती. गुरुवारी झालेल्या काँग्रेस विधिमंडळ पक्षाने औपचारिकरीत्या सिद्धरामय्या यांची नेता म्हणून निवड केली. त्यानंतर त्यांनी राज्यपालांना भेटून सरकार स्थापनेचा दावा केला होता. दरम्यान, आज (२० मे) बंगळुरुमधील कांतीरवा मैदानात हा शपथविधी सोहळा पार पडला. सिद्धरामय्या दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले आहेत. दरम्यान, या शपथविधीपूर्वी काँग्रेस नेते सिद्धरामय्या आणि डी. के. शिवकुमार यांनी दिल्लीत जाऊन मंत्रिमंडळाची स्थापना आणि खातेवाटप अशा काही महत्त्वाच्या मुद्द्यांवर पक्षश्रेष्ठींशी चर्चा केली. तसेच त्यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांचीही भेट घेतली. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांचा मुलगा आणि काँग्रेस आमदार प्रियांक खर्गे यांनीदेखील मंत्रीपदाची शपथ घेतली.

---

# केंद्र-आप संघर्षाची नवी ठिणगी

## दिल्लीतील प्रशासकीय सेवांवरील नियंत्रणाचा वाद सर्वोच्च न्यायालयात

।नवी दिल्ली।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**दिल्लीतील प्रशासकीय सेवांवर नियंत्रण ठेवण्याबाबतचा दिल्ली सरकार आणि केंद्र सरकार यांच्यातील वाद पुन्हा सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. आप सरकारच्या बाजूने दिलेल्या निकालाचा फेरविचार करण्याची मागणी केंद्राने सर्वोच्च न्यायालयाकडे केली आहे, तर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केंद्राच्या वटहुकूमाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याची घोषणा केली आहे.**



### वटहुकूम घटनात्मकच : भाजप

**नवी दिल्ली : दिल्लीतील सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नियुक्त्यांबाबतच्या वटहुकूमाचे भाजपने समर्थन केले. हा वटहुकूम घटनेशी सुसंगत आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणांच्या अनुषंगाने आहे. तसेच हा निर्णय सामान्य नागरिकांच्या हिताचा आहे, अशी प्रतिक्रिया भाजपचे प्रवक्ते गौरव भाटिया यांनी दिली. आपची विचारधाराच घटनेच्या विरोधात आहे, अशी टीकाही त्यांनी केली.**

सार्वजनिक सुव्यवस्था, पोलीस आणि जमीन वगळून दिल्ली सरकारला वैधानिक आणि सेवांबाबतचे अधिकार असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने ११ मे रोजी दिला होता. त्यामुळे राष्ट्रीय राजधानी दिल्लीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नियुक्त्यांचे अधिकार दिल्लीतील आप सरकारकडे आले होते. परंतु केंद्राने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि नियुक्त्यांसाठी शुक्रवारी 'राष्ट्रीय राजधानी नागरी सेवा प्राधिकरणा'ची स्थापना करण्याच्या दृष्टीने एक वटहुकूम जारी केला. त्याला दिल्लीचे मुख्यमंत्री आणि 'आप'चे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. सर्वोच्च न्यायालयाची सुट्टी सुरू झाल्यानंतर काही तासांतच केंद्राने सर्वोच्च न्यायालयाचा निकाल रद्द करण्यासाठी वटहुकूम जारी केला आहे. हा सर्वोच्च न्यायालयाचा अवमान आहे, असा आरोप केजरीवाल यांनी केला.

दरम्यान, घटनापीठाच्या ११ मेच्या निकालात त्रुटी आहेत, कारण तो मूलभूतरित्या चुकीचा आहे, असा आक्षेप घेत केंद्राने दिल्ली सरकारला वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि बदल्यांचे अधिकार देणाऱ्या निकालाच्या फेरविचारासाठी याचिका दाखल केली आहे. या पुनर्विचार याचिकेची खुली सुनावणी घ्यावी, यासाठी केंद्राने सर्वोच्च न्यायालयात अर्जही दाखल केला आहे. हा मुद्दा राष्ट्रीय राजधानी असलेल्या दिल्ली सरकारच्या यंत्रणेच्या कामकाजाशी संबंधित असून तिची खुली सुनावणी न घेतल्यास अन्यायकारक होईल, असे केंद्राने नमूद केले आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायमूर्तीच्या घटनापीठाने दिल्ली सरकारच्या याचिकांवर ११ मे रोजी महत्त्वपूर्ण निकाल दिला होता. त्यानुसार दिल्ली सरकारला वर्ग-अ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या आणि बदल्यांचे अधिकार बहाल झाले होते. या निकालानंतर केंद्र आणि दिल्ली सरकार यांच्यात २०१५पासून सुरू असलेला 'सेवांवर नियंत्रणा'बाबतचा वाद संपुष्टात येईल.

# बॉलिवूडमधील मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खान देखील आहे बागायतदार



मुंबई : बॉलिवूडमध्ये आमिर खान हा मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून ओळखला जातो. अभिनयाबरोबरच आमिर उत्तम दिग्दर्शक-निर्माता आहे हे तर सगळ्यांना महिती आहे. अभिनयाच्या विश्वात आमिर खाननं स्वतःच असं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. मात्र आमिर खानबद्दल एक गोष्ट फारशी कुणाला माहिती नाही. ती म्हणजे मिस्टर परफेक्शनिस्ट असलेला आमिर खान आंबा बागायतदार आहे. ऐकून आश्चर्य वाटेल पण आमिरच्या मालकीच्या बागेतील आंब्यांची चव अनेक दिग्गज कलाकारांनी चाखली आहे.उत्तर प्रदेशातील हरदोई जिल्ह्यात शहाबाद शहर आंबा बागायतीचा पट्टा म्हणून ओळखला जातो. याच पट्ट्यात आमिर खान याच्या मालकीच्या आंब्यांच्या बागा देखील आहेत. याशिवाय आमिरचे वडिलोपार्जित घर शहाबादमध्येच आहे. त्याचे पूर्वज अख्तरपूरचे रहिवासी होते. आमिर खानचे नातेवाईक अजूनही अख्त्यारपूर गावात वास्तव्यास असून या गावात आमिर खानची आंब्याची मोठी बाग आहे. शहाबादमधील अख्त्यारपूर गावात आमिर खानची मोठी बाग आहे. आमिरचे नातेवाईक नईम खान सांगतात की, शहाबादमध्ये शंभरहून अधिक प्रकारचे आंबे मिळतात. येथील विशेष आंब्याचे रोप माजी राष्ट्रपती झाकीर हुसेन यांनी ऑर्डर केले होते आणि ते राष्ट्रपती भवनाच्या अशोका गार्डनमध्ये देखील लावले होते.

# "...तेव्हा मला आईने झाडूने मारलं होतं"-प्राजक्ता माळी



**मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी कायमच चर्चेत असते. प्राजक्ताचा चाहता वर्ग मोठा असून ती सोशल मीडियावरुन चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करते. प्राजक्ताने एका कार्यक्रमादरम्यान तिच्या कॉलेज जीवनातील एक प्रसंग सांगितला होता.**

प्राजक्ता अभिनेत्रीबरोबरच एक उत्तम नृत्यांगणा व लेखिकाही आहे. प्राजक्ताचं 'प्राजक्तप्रभा' हे पुस्तकही प्रकाशित झालं आहे. सुरुवातीला तिला डायरी लिहायचीही आवड होती. त्यामुळे दिवसभरात घडलेल्या सगळ्या गोष्टींची नोंद प्राजक्ता डायरीमध्ये करायची.

प्राजक्ता कॉलेजमध्ये शिकत असताना डायरी तिच्या आईला सापडली. याचाच किस्सा प्राजक्ताने सांगितला होता.

"एखाद्या प्रसंगाबद्दल मला जे वाटतं ते मी माझ्या डायरीत लिहायचे. त्यावेळी एखाद्या प्रसंगाबाबत काय वाटत होतं, हे आज वाचताना मला फार गंमत वाटते. आज माझ्याकडे ७-८ वर्षांपूर्वीच्याही डायरी आहेत. असंच एके दिवशी माझ्या आईला माझी डायरी सापडली. तेव्हा मी अकरावीत शिकत होते", असं प्राजक्ता म्हणाली.

# अनुराग कश्यप याच्या लेकीचा झाला साखरपुडा

बॉलिवूडचा प्रसिद्ध दिग्दर्शक अनुरगा कश्यप याची मुलगी आलिया कश्यप अनेकदा चर्चेत असते. गेल्या काही दिवसांपासून आलिया तिच्या परदेशी बॉयफ्रेंडमुळे चर्चेत आली आहे.आलिया शेनबरोबरचे तिचे रोमँटिक फोटो देखील सोशल मीडियावर शेअर करत असते. आलिया आणि तिचा बॉयफ्रेंड पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. आलिया आणि शेन यांनी साखरपुडा केला असून त्यांचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. खुद्द आलियानंच हे फोटो तिच्या सोशल मीडियावर शेअर केले आहेत.



आलियानं तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून तिच्या साखरपुड्याचे दोन फोटो शेअर केले आहेत.पहिल्या फोटोमध्ये आलियानं तिच्या बोटातील साखरपुड्याची अंगठी दाखवत आहे. तर दुसऱ्या फोटोमध्ये आलिया आणि शेन एकमेकांना किस करताना दिसत आहेत. या दोन्ही फोटोंमध्ये आलिया आणि शेन खूप आनंदी दिसत आहेत.

फोटो शेअर करताना आलियानं लिहिलं आहे की, 'तर अखेर झालं... माझा सर्वात चांगला मित्र, माझा साथीदार, माझा जोडीदार आणि आता माझा होणार नवरा तुझ्यासाठी... तू माझ्या आयुष्यातील एकमेव प्रेम आहे. निर्मळ, निर्व्याज आणि निरपेक्ष प्रेम कसं असतं याची जाणीव तू मला करून दिली याबद्दल मनापासून धन्यवाद. हे तुझ्यासाठी खरं तर खूप सोपं काम होतं. आता मला माझं आयुष्य तुझ्याबरोबर घालवायचं आहे. मी कायम तुझ्यावर प्रेम करत राहिन...' आलियानं शेअर केलेल्या या फोटोंवर नेटकरी भरभरून कॉमेन्ट करत तिला शुभेच्छा देत आहेत.

# उर्फी जावेदच्या फॅशनला कंटाळून वकिलानेच! केली तक्रार



सोशल मीडियावर आपल्या अतरंगी कपड्यांमुळे प्रसिद्ध असलेली अभिनेत्री आणि मॉडेल उर्फी जावेदच्या अडचणीत वाढ झालेली आहे. उर्फीच्या रोजच्या चित्र-विचित्र फॅशनला कंटाळून मुंबईतील एका वकीलाने स्वतः अंधेरी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. 11 डिसेंबर रोजी वकील अली काशिफ खान देशमुख यांनी तिच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे.

### उर्फी जावेद समाजात अश्लीलता पसरवते

उर्फी जावेद अश्लील पोशाख परिधान करुन समाजात आणि सोशल मीडियावर अश्लीलता पसरवते असा आरोप तिच्यावर करण्यात आला आहे. वकील अली काशिफ खान देशमुख यांनी लिखित स्वरुपात अर्ज देत अशी तक्रार दाखल केली आहे. शिवाय उर्फीच्या फॅशनला सोशल मीडियावर वाईट पद्धतीने अनेकजण ट्रोल देखील करतात मात्र तरीही तिच्यावर कोणताच परिणाम होत नाही. ती प्रत्येकवेळी ट्रोलर्सला सडेतोड उत्तर देते.

### दिल्लीमध्ये देखील झाली होती तक्रार

याआधी देखील उर्फी विरोधात दिल्लीच्या पोलीस ठाण्यात एका व्यक्तीने तक्रार दाखल केली होती. यावेळी देखील उर्फीवर समाजात अश्लीलता पसरवत असल्याचा आरोप उर्फीवर करण्यात आला होता. शिवाय मागील काही दिवसांपूर्वी ती 'हाय हाय ये मजबूरी' या म्युझिक व्हिडीओमुळेही देखील अडचणीत सापडली होती.मागील काही दिवसांपूर्वी लेखक चेतन भगतने तिच्या कपड्यांवरुन खिल्ली उडवली होती. तर हिंदुस्तानी भाऊने देखील उर्फीला धमकी दिली होती. तेव्हाही उर्फीने त्यांना सडतोड उत्तर दिलं. सध्या उर्फी स्प्लिट्सविला शोमध्ये व्यस्त आहे.

# मुंबई इंडियन्सचे जिंकू किंवा मरु!

## » मुंबई इंडियन्स vs सनरायजर्स हैदराबाद: मुंबई इंडियन्सला विजयाची आस

**मुंबई वि. हैदराबाद**

- »ठिकाण : वानखेडे स्टेडियम,
- » वेळ : दुपारी ३.३० पासून
- » प्रक्षेपण : स्टार स्पोर्टस




| मुंबई |
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**आयपीएल पाच वेळच्या विजेत्या मुंबई इंडियन्सला आयपीएल क्रिकेट स्पर्धेतील 'प्ले-ऑफ'च्या आशा उंचावण्यासाठी आज रविवारी सनरायजर्स हैदराबादविरुद्ध मोठ्या विजयाची आवश्यकता आहे. स्पर्धेतील आव्हान आटोपल्यामुळे कोणतेही दडपण नसलेला हैदराबादचा संघ मुंबईची 'प्ले-ऑफ'ची समीकरणे बिघडवू शकतो.**

मुंबईने घरच्या मैदानावर सहापैकी चार सामने जिंकले आहेत. त्यांना निव्वळ धावगती उंचावण्याची आज अखेरची संधी आहे. १४ गुण असलेल्या राजस्थानची (०.१४८) निव्वळ धावगती मुंबईपेक्षा (-०.१२८) सरस आहे. त्यातच मुंबईला कदाचित विजयही पुरेसा ठरणार नाही. बेंगळुरूच्या निव्वळ धावगतीस (०.१८०) मागे टाकणे मुंबईसाठी खूपच अवघड आहे. रोहित शर्मा आणि त्याच्या साथीदारांना गुजरातविरुद्ध दणदणीत विजयाची संधी असताना राशीद खानने केलेली फटकेबाजी; तसेच लखनऊविरुद्ध स्वीकारावी लागलेली पाच धावांनी हार सलत असेल. खराब गोलंदाजीचा मुंबईला यंदाच्या लीगमध्ये फटका बसला आहे. याची पुनरावृत्ती मुंबईला आज परवडणार नाही. कर्णधार रोहित शर्माच्या फलंदाजीतील चढउतार जास्त चिंतेची बाब आहे. रोहितच्या अपयशामुळे सुर्यकुमार यादव, टीम डेव्हिड, कॅमेरून ग्रीन, ईशान किशन आणि नेहल वढेरा यांच्यावरील दडपण वाढत आहे. मोसमाची सांगता विजयाने करण्याचे हैदराबादचे लक्ष्य असेल. हेच लक्ष्य मुंबईची समीकरणे जास्त अवघड करू शकेल.

**यंदाच्या स्पर्धेत**


- » मुंबईचा गेल्या चारपैकी दोन सामन्यांत पराभव; पण सहा सामन्यांत चार विजय. सलग चौथी हार टाळण्याचे हैदराबादचे लक्ष्य
- » गेल्या पाच सामन्यांत : मुंबईचे तीन विजय आणि दोन पराभव, तर हैदराबादचा एक विजय आणि चार पराभव
- » एकमेकांविरुद्ध : दोघांमधील वीस लढतींत मुंबईचे ११-९ असे वर्चस्व
- » नाणेफेकीनंतर : प्रतिस्पर्धी धावांच्या पाठलागासच पसंती देण्याची शक्यता
- » खेळपट्टीचा अंदाज : या मोसमात फलंदाजांना पुरेपूर साथ देणाऱ्या खेळपट्टींमध्ये 'वानखेडे'चा समावेश. यंदाच्या मोसमात या खेळपट्टीवरील सरासरी धावा १९८
- » हवामानाचा अंदाज : तापमान ३२ अंशाच्या आसपास. ६० टक्के आर्द्रता खेळाडूंचा कस पाहणार

---

## विश्वचषक तिरंदाजी स्पर्धा : प्रथमेश जावकरचा सुवर्णवेध; ओजस-ज्योती जोडीलाही सोनेरी यश

| शांघाय|
महाईन्यूज | प्रतिनिधी|

भारताचा युवा तिरंदाज प्रथमेश जावकरने नेदरलँड्सच्या जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असलेल्या माइक श्लोएसरला पराभवाचा धक्का देत शनिवारी विश्वचषक तिरंदाजी स्पर्धेत पुरुषांच्या वैयक्तिक कम्पाऊंड प्रकारात सुवर्णपदक जिंकले. तसेच ओजस देवतळे व ज्योती सुरेखा वेन्नम या जोडीने मिश्र सांघिक गटात कोरियाच्या मजबूत संघाला नमवत सुवर्णयश मिळवले. ओजस व ज्योती जोडीने अंताल्या येथे झालेल्या विश्वचषकाच्या पहिल्या टप्प्यात सुवर्णपदक जिंकले होते. दुसऱ्या टप्प्यातही त्यांनी आपली दमदार कामगिरी सुरूच ठेवली. भारतीय जोडीने कोरियाच्या अग्रमानांकित जोडीला १५६-१५५ असे नमवले. प्रथमेशने पुरुषांच्या कम्पाऊंड प्रकारातील वैयक्तिक गटाच्या अंतिम फेरीत नेदरलँड्च्या माइकवर १४९-१४८ असा विजय साकारला. १९ वर्षीय प्रथमेशने दोन जागतिक विजेतेपदे मिळवणाऱ्या तिरंदाजाविरुद्ध केवळ एक गुण गमावला. अंतिम लढतीच्या पहिल्या फेरीत एक गुण गमावल्यानंतर दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीत दोन्ही तिरंदाजांनी अचूक वेध साधला. पाचव्या फेरीत नेदरलँड्च्या खेळाडूकडून चूक झाली. त्यामुळे प्रथमेशला पहिले सुवर्णपदक जिंकण्यात यश मिळाले. त्यापूर्वी, ओजस व ज्योती ही भारतीय जोडी, तसेच किम जोंघो आणि ओह योहुन या अनुभवी कोरियन जोडीने पहिल्या तीन फेऱ्यांमध्ये समान ३९ गुणांची कमाई केली.



## रिंकू सिंग खेळला पण केकेआर हरली, विजयासह लखनौचा संघ Playoffs मध्ये दाखल

### »विजयासाठी 177 धावांचे आव्हान होते

| कोलकाता|
महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**लखनौने यावेळी एका धावेने सामना जिंकला आणि त्यांनी प्ले ऑफमध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. लखनौच्या संघाने केकेआरपुढे विजयासाठी १७७ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना केकेआरने चांगली सुरुवात केली होती. पण त्यांचे दोन्ही सलामीवीर बाद झाले आणि सामना त्यांच्या हातून निसटायला सुरुवात झाली. रिंकू सिंगने अर्धशतक झळकावले, पण त्याला संघाला विजय मिळवून देता आला नाही.**

लखनौच्या १७७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना कोलकाताला ६१ धावांची दमदार सलामी मिळाली. कारण वेंकटेश अय्यर आणि जेसन रॉय यांनी सुरुवातीपासून दमदार फटकेबाजी सुरु केली होती. या गोष्टीचा केकेआरला चांगलाच फायदा झाला. पण वेंकटेश अय्यर हा २४ धावांवर बाद झाला आणि केकेआरला पहिला धक्का बसला. त्यानंतर काही वेळातच जेसन रॉयही बाद झाला. यावेळी त्याचे अर्धशतक पाच धावांनी हुकले, जेसनने २८ चेंडूंत सात चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ४५ धावा केल्या. हे दोन्ही सलामीवीर बाद झाले आणि त्यानंतर केकेआरच्या संघाची पडझड सुरु झाली.

केकेआरच्या गोलंदाजांनी यावेळी लखनौला सुरुवातीपासून धक्के द्यायला सुरुवात केली. लखनौच्या संघाला तिसऱ्या षटकापासून एकामागून धक्के बसायला सुरुवात झाली. तिसऱ्या षटकात लखनौने आपला सलामीवीर करन शर्माला गमावले




आणि त्यानंतर एकामागून एक फलंदाज बाद होत गेले. या सामन्यात लखनौचा अर्धा संघ ७३ धावांवर बाद झाला होता. त्यावेळी ते मोठी धावसंख्या उभारतील असेल वाटत नव्हते. पण त्यावेळी निकोलस पुरन लखनौच्या मदतीला धावून आला. यावेळी पुरनने ३० चेंडूंत चार चौकार आणि पाच षटकारांच्या जोरावर ५८ धावांची खेळी साकारली. पुरनच्या या खेळीच्या जोरावर लखनौच्या संघाला २० षटकांत ८ बाद १७६ अशी दमदार धावसंख्या उभारता आली होती.

लखनौला दुसरे स्थान पटकावून चेन्नईला तिसऱ्या स्थानी ढकलायचे असेल तर त्यासाठी एक समीकरण समोर आले होते. जर लखनौच्या संघाने २०० पेक्षा जास्त धावा केल्या आणि जर त्यांनी ९६ धावांनी विजय साकारला किंवा लखनौच्या संघाने जर २०० पेक्षा